# वृत्त प्रसिद्धीकरीता

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे मार्फत '**माहितीचा अधिकार अधिनियम** 2005' या कायद्याचे प्रशिक्षण देणारा **दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम** पुन्हा नव्याने सुरु करण्यात आला आहे. तुकडी क्र. 74 माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, 2025 या कालावधीकरीता [पहिले संपर्क सत्र दिनांक 12 ऑक्टोबर, 2025, दुसरे संपर्क सत्र दिनांक 23 नोव्हेंबर, 2025 आणि तिसरे संपर्क सत्र दिनांक 21 डिसेंबर, 2025] या कालावधीत मराठी माध्यमामध्ये आयोजित करण्यात येत आहे. माहितीचा अधिकार कायद्याविषयी अधिक माहिती व ज्ञान प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या जाणत्या समाज घटकांतील प्रतिनिधींकरीता दूरशिक्षणाच्या माध्यमातून हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. हा अभ्यासक्रम नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, गृहिणी, समाज संशोधक, स्वयंसेवी संस्था, माध्यमातील व्यक्ती, सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी या सर्वांसाठी उपयुक्त आहे. यशदाबरोबरच जिल्हास्तरावरील संस्थांमध्येही ह्या प्रशिक्षणाची सुविधा आहे.

दूरशिक्षण अभ्यासक्रमाचे अनिवासी प्रशिक्षण शुल्क रु. 4500/- आणि यशदा निवासी प्रशिक्षण शुल्क रु. 7500/- (सर्व करांसह) असे निश्चित करण्यात आले आहे. (निवासी शुल्कामध्ये Single or Sharing Occupancy सुविधा उपलब्ध आहे.) प्रशिक्षणार्थींना स्वखर्चाने प्रशिक्षण संस्थेमध्ये यावे लागेल, त्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व इतर भत्ते देय असणार नाही. प्रत्येक तुकडी 50 प्रशिक्षणार्थी अशी मर्यादित आहे. वर्षभरात कोणत्याही तुकडीकरीता आगाऊ नावनोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

अभ्यासक्रमाची नावनोंदणी यशदातील माहिती अधिकार केंद्रात सुरु करण्यात आली आहे. प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राध्यान्य याप्रमाणे प्रवेश दिला जाईल. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला पूर्ण माहिती भरलेला अर्ज, एक रंगीत छायाचित्र ओळखपत्राची छायांकित प्रत प्रवेशाकरीता आवश्यक राहिल. नावनोंदणी अर्ज, अभ्यासक्रमाचा तपशील, नाव नोंदणी करण्याची सुविधा यशदा कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

संकेतस्थळ : www.yashada.org (माहिती अधिकार केंद्र यामध्ये पहावे.)

अधिक माहितीसाठी संपर्क : कार्यक्रम समन्वयक,
माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-7
दूरध्वनी : 020-25608216 (कार्यालयीन वेळ 10.00 ते 5.30)